लवाद दावा क्र. ८४/२०२०
एकनाथ वि. लवाद व इतर २

**निशाणी क्र. १६ खालील आदेश**
**CNR Number:. MHLA010020212020**

१. प्रस्तुतचा अर्ज सामनेवाला क्र.१ यांनी त्यांच्या विरुद्ध "प्रकरण एकतर्फा चालवण्याचा" झालेला हुकूम रद्द करुन त्यांना सदर प्रकरणामध्ये हजर करून घेऊन त्यांची कैफियत फैलावर घ्यावी यासाठी दाखल केला आहे.

२. अर्जदार यांनी त्याच अर्जावर त्याचे म्हणणे दाखल करुन सदर अर्जास जोरदार हरकत घेतली आहे.

३. दोन्ही पक्षांचे म्हणणे ऐकले.

४. सदर प्रकरणामध्ये सामनेवाला क्र. १ हे लवाद, राष्ट्रीय महामार्ग अधिकारी म्हणजेच जिल्हा दंडाधिकारी, लातूर हे आहेत. त्यांना सदर प्रकरणामध्ये दि.०४/१२/२०२० रोजी नोटीस बजावली होती. परंतु ते या प्रकरणामध्ये दि.२५/८/२०२२ पर्यंत हजर झाले नाहीत. त्यामुळे दि.३०/०८/२०२१ रोजी त्यांच्याविरूध्द "प्रकरण एकतर्फा चालविण्याचा" हुकुम पारीत करण्यात आला आहे.

५. आता सामनेवाला क्र.१ यांना सदर प्रकरणामध्ये हजर होऊन त्यांचा बचाव सादर करावयाचा आहे.

६. योग्य न्याय होण्याच्या दृष्टीकोनातून अर्जदार व सामनेवाला यांना

त्यांचे लेखी म्हणणे मांडण्याची व त्यानुसार पुरावा देण्याची योग्य ती संधी समान पद्धतीने देणे आवश्यक असते. या न्यायाने आता सामनेवाला क्र. १ यांनी याच अर्जासोबत त्यांची कैफियत या प्रकरणामध्ये दाखल केली आहे.

७. वर नमूद परिस्थितीचा विचार करता ती कैफियत फैलावर घेणे आवश्यक आहे. त्यासाठी त्यांना हजर होण्याची संधी देणे आवश्यक आहे. अशी संधी सामनेवाला क्र.१ यांना दिल्यास अर्जदार यांचे कोणतेही नुकसान होणार नाही. या उलट प्रस्तुत प्रकरण गुणदोषावर निकाली काढणे आवश्यक होईल ते न्यायाच्या दृष्टीने योग्य आहे. सबब पुढीलप्रमाणे आदेश पारीत करण्यात येत आहे.

<u>आदेश</u>

१. सामनेवाला क्र. १ यांचा अर्ज निशाणी १६ मंजुर करण्यात येत आहे.

२. सामनेवाला क्र. १ यांचे विरुद्ध दि. ३०.०८.२०२१ रोजी निशाणी ०१ वर झालेला "एकतर्फा प्रकरण चालवण्याचा" झालेला हुकुम रद्द करण्यात येत आहे.

३. सामनेवाला क्र. १ यांना दि.२५.०८.२०२२ रोजी दाखल केलेले कैफियत फैलावर घेण्यात येत आहे व त्यास निशाणी क्र. १७ देण्यात येत आहे.

स्वाक्षरीत/-

दि.: ०८.०९.२०२२

(श्रीमती सुरेखा कोसमकर)
प्रमुख जिल्हा न्यायाधीश, लातूर.